

रेशीम कीटक संगोपन शेडची अंतर्गत रचना व सुरू असलेली बॅच.

# ‘जो करेल तंत्राने रेशीम शेती, तो पिकवेल मातीतून मोती’

## बदलले मराठवाड्यातील रेशीम उद्योगाचे स्वरूप

तुतीची लागवड केली जात आहे. त्यामुळे पूर्वीच्या सहा महिने कालावधीपेक्षा तीन महिन्यांतच बाग संगोपनात येते. पूर्वी ३० टक्क्यांपेक्षा अधिक तुटाळी पडायची. आता ही समस्या दूर झाली आहे. पूर्वी अळ्यांना पाल्याचे पूर्णेक पान तोडून टाकण्याची पद्धत होती. यात श्रम, वेळ आणि मजुरांची संख्या अधिक लागायची. त्यावर मात करण्यासाठी शेतकरी आणि रेशीम विभागाच्या मंथनातून फांदी पद्धतीने अळ्यांना पाला उपलब्ध करून देण्याची पद्धत आली. ती पुढे काय्म रूढ झाली. त्यामुळे मजूरखर्चात ४० ते ४५ टक्के बचत शक्य झाली.

### बायव्होल्टाइन कीटकाचा वापर

पूर्वी कीटकांच्या ज्या जाती होत्या त्यापासून प्रति १०० अंडीपुंजांना २५ किलोपर्यंत कोष उत्पादन मिळायचे. पुढे कोलार गोल्ड जातीचे कीटक आले. त्यांच्यापासून हेच उत्पादन ४५ किलोपर्यंत मिळू लागले. सन २००२ च्या सुमारास बायव्होल्टाइन सिंगल हायब्रीड कीटकाची जात उपलब्ध झाली. त्यापासून ५० ते ६० किलो उत्पादन मिळू लागले. दोन- तीन वर्षांत बदल होऊन बायव्होल्टाइनच्या डबल हायब्रीड जातीच्या अळ्या उपलब्ध झाल्या. त्यापासून ८० ते ९० किलोपर्यंत उत्पादन मिळू लागले. जे आजपर्यंत घेण्यात येत आहे.

### शेडची रचना

पूर्वी घरी, झोपड्यात किंवा काही शेतकरी डेरेदार झाडांखाली कीटक संगोपन करायचे. त्यात अनेक अडचणी यायच्या. धोके होते. आता ४० ते ५० बाय २० फुटाचे शेड, त्यात बांबूच्या साहाने रॅकनिर्मिती केली जाते. बांबू रॅकऐवजी लोखंडी रॅक वापरण्याचीही संकल्पना पुढे आली. छतावर टीन पत्रा, जमिनीवर सिमेंटचा कोबा, त्यावर फरशी, चहूबाजूंनी तीन फूट उंचीची भिंत, त्यावर पुढे जाळी, आवश्यकतेनुसार नेट आणि बारदान्याचा वापर असे आदर्श शेड उभे राहू लागले. जे पारंपरिक राज्यांतील शेडपेक्षा चार ते पाच पट कमी खर्चात तयार होतात.

### चॉकी कीटक संगोपन केंद्र

पूर्वी चॉकी निर्मिती (सुरुवातीच्या दोन बाल्यावस्था) करताना रेशीम उत्पादकांना तापमान व आर्द्रता नियंत्रित ठेवणे कठीण जायचे. काही वेळा या अळीअवस्था वेळेवर ओळखता येत नसत. आता म्हैसूर येथे तीन महिन्यांच्या प्रशिक्षण सुविधेमुळे रेशीम उत्पादक तांत्रिकदृष्ट्या सक्षम झाले. आजमितीला राज्यातील ९० टक्के चॉकीचा पुरवठा त्यांच्यामार्फत होतो. त्यातून शेतकऱ्यांना ११ दिवसांची बॅच २१ दिवसांवर आणणे शक्य होऊन वेळ व श्रमांची बचत करता आली.

### उन्हाळ्यातही उत्पादन

जालना जिल्ह्याचे रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते सांगतात की मराठवाड्यात एप्रिल-मेमध्ये ४० अंशाच्या पुढे तापमान जाते. पूर्वी या काळात बॅच घेणे शक्य होत नसे. अलीकडील वर्षांत मात्र शेतकऱ्यांनी आपल्या बुद्धिकौशल्यातून एप्रिल-मे काळात कोष उत्पादन शक्य करून दाखविले आहे. शेडच्या बाजूला नेट, बारदान लावणे, त्यावर ठिबक तोटीद्वारे पाणी सोडणे, शेडच्या चहूबाजूला शेवगा किंवा वृक्षांची लागवड, फॉगर्स, शेडच्या छतावर पाचट आच्छादन करून त्यावर पाणी सोडणे अशा उपायांमधून शेडमधील तापमान २८ अंशांपर्यंत आणण्यात शेतकरी यशस्वी झाले. या काळात बाजारपेठेत विक्रेचा खंड पडू नये यासाठी काहींनी मोठ्या पंखे उभारले आहेत.

### उंचावले अर्थकारण

बदलले तंत्रज्ञान, सुधारित व्यवस्थापन व लाभलेल्या बाजारपेठा यातून मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे अर्थकारण रेशीम शेतीतून उंचावले आहे. प्रति १०० अंडीपुंजामागे ८० ते ९० किलो व कमाल १०० किलोपर्यंत कोष उत्पादन मिळते आहे. प्रति किलो ३५० ते ४०० रुपये वा त्याहून अधिक दर मिळत असल्याने हाती समाधानकारक उत्पन्न पडत आहे.

> **रेशीम अभियानाची मदत**
>
> आम्ही दरवर्षी रेशीम अभियान राबवतो. त्यात राज्यातील सुमारे १० हजार शेतकऱ्यांची निवड करतो. त्यातून तुती लागवड व रेशीम कीटक संगोपन शास्त्राचे प्रशिक्षण देण्यात येते. त्यातून सुधारित तंत्रज्ञानाला चालना मिळाली आहे. जालना जिल्ह्यात ‘सॉइल ते सिल्क’ (रेशीम शेती ते वस्त्रनिर्मिती) असे क्लस्टर तयार करण्याचा प्रकल्प यशस्वी होतो आहे. स्वयंचलित धागा निर्मिती उद्योगाला चालना मिळाली आहे. जालना येथेच कोषांना बाजारपेठ तयार झाल्याने रामनगरपर्यंत दूर जाण्याची गरज कमी झाली आहे. राज्यात अन्य ठिकाणीही असा स्थानिक बाजारपेठा तयार झाल्या आहेत असे जालना जिल्ह्याचे रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते यांनी सांगितले.
>
> अजय मोहिते,
> ८२०८३५४३९१
> बी. डी. डेंगळे,
> ८८३०७१४०४७
> (जिल्हा रेशीम विकास अधिकारी, छत्रपती संभाजीनगर)





> शेडची विशिष्ट रचना केल्याने आतमध्ये हवा खेळती राहणे तापमान, आर्द्रता नियंत्रित ठेवणे शक्य झाले आहे. तद्वीमाशी नियंत्रणासाठी आम्ही नेटचा वापर करतो. अभ्यासातून तापमान वाढीवर उपाय शोधल्याने एप्रिल-मेमध्येही कोष उत्पादन घेणे शक्य केले आहे.
>
> - शहादेव ढाकणे,
> ९४०३५ ५०२५७,
> देवगाव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर



चॉकी सेंटर चालक संतोष व मंगल वाघमारे दांपत्य.

> सन २०११ पासून आम्ही रेशीम उद्योगात आहोत. ‘जो करेल रेशीम शेती, तो पिकवेल मातीतून मोती’ या उक्तीचा अनुभव घेत आहोत. आम्ही एक एकरातील तुती लागवडीपासून सुरुवात केली. आज ११ एकरात तुती लागवड आहे. प्रत्येक टप्प्यावर नवनवीन तंत्रज्ञान वापरत आम्ही प्रगती केली. त्याबद्दल उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल ‘सेंट्रल सिल्क बोर्ड’चा उत्कृष्ट चॉकी सेंटर पुरस्कार आम्हाला प्राप्त झाला.
>
> संतोष व मंगल वाघमारे,
> केकतजळगाव, ता. पैठण, छत्रपती संभाजीनगर
> ८८८८५४४५९६